# मेट्रो-३च्या भुयारीकरणाचा ३४ वा टप्पा पूर्ण

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन(मुं.मे.रे.कॉ) द्वारे चर्चगेट ते हुतात्मा चौक हा ६४८ मी. इतका लांब ३४ वा भुयारीकरणाचा टप्पा शुक्रवारी यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला. एकूण ५०६ रिंग्जच्या सहाय्याने २९२ दिवसांत हे अप लाईन मार्गाचे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले. हुतात्मा चौक स्थानक मेट्रो-३ मार्गावरील एक महत्त्वाचे स्थानक आहे. पॅकेज-१ अंतर्गत कफ परेड, विधान भवन, चर्चगेट आणि हुतात्मा चौक या मेट्रो स्थानकांचा समावेश असून हुतात्मा चौक स्थानकाचे एकूण ५३% काम पूर्ण झाले आहे. पॅकेज-१ मध्ये एकूण ८१% भुयारीकरण आणि ७०% बांधकाम पूर्ण झाले आहे.